NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक १०.११.२०२६ मंगळवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ०९.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १० केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण १५,४६०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये १९ ईसमावर कारवाई करून एकुण ५७,२००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. त्याचप्रमाणे, दिनांक ०८.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०९.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०९ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पिडींग कलम ११२/१८३ मोवाका अन्वये ३२ केसेस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ७८ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ९९ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ५२ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ४३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ४६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ९१ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०४ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २७ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये १६ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १००३ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये २५ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २२ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १६५३ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ३,५८,५००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :– जिवे ठार मारणाऱ्या आरोपींना अटक.

दिनांक ०९.११.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, फिर्यादी अक्षय गंगाधर नौकरकर, वय ३१ वर्ष, रा. प्लॉट क्र. ३३, देवनगर, कॅपिटल जिमचे बाजुला, बजाजनगर नागपूर हे त्यांचा मित्र नामे अमन उर्फ बॉबी सुनिल सपाटे, वय २७ वर्ष, रा. प्लॉट क्र. १४, जयभोले सोसायटी, पिपळा फाटा, हुडकेश्वर, नागपूर याचेसह कारने त्यांचा मित्र नामे प्रसाद राऊत, रा. देवनगर, नागपूर यांचे वाढदिवसाकरीता जात असतांना, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत देवनगर चौकातील ज्युस दुकानासमोर त्यांचे कारसमोर काही मुले फटाके फोडत असतांना, त्यांना कारचालक फिर्यादीचे मित्राने हकटले असता, याचा राग येवुन, फटाके फोडणारे आरोपी अक्षय मडावी व त्याचे २ ते ३ साथीदार यांनी फिर्यादीचे मित्रासोबत भांडण करुन व संगनमताने त्याचेजवळील चाकुने फिर्यादीचा

मित्र नामे अमन उर्फ बॉबी याचे पोटावर वार करुन, त्यास गंभीर जखमी केले. जखमीस उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, त्यास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले होते. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे आरोपीविरूध्द कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी भेट देवुन, तसेच तांत्रीक तपास करून व गोपनिय बातमीदार मार्फतीने मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, गुन्ह्यातील मुख्य आरोपी क्र. १) अक्षय किशोर मडावी, वय २९ वर्षे, रा. फुटाळा वस्ती, अमरावती रोड, अंबाझरी, नागपुर यास पो.ठाणे राणाप्रताप नगर हद्दीत प्रतापनगर चौक, अतीथी रेस्टॉरेंट जवळुन ताब्यात घेतले. त्यास वर नमुद गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच, त्याचा साथीदार आरोपी क्र. २) पियुष महेश नेनवानी, वय ३१ वर्षे, रा. फ्लॅट क्र. ३०३, अनुपमा माईल स्टोन, जरीपटका रिंग रोड, जरीपटका, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्यांने गुन्ह्यातील आरोपी क्र. १ हा गुन्ह्यात पाहीजे आरोपी असल्याचे माहीत असुनसुध्दा, त्यास लपण्यासाठी राहण्याची व्यवस्था करून, त्यास मोबाईल सिमकार्ड देवुन, त्याचे उपजिवीकेची व्यवस्था करण्याची मदत केल्याचे कबुल केले. दोन्ही आरोपींचे ताब्यातुन किया कंपनीची सोनेट कार, एक डिओ मोपेड, आयफोन/मोटोरोला/सॅमसंग कंपनीचे एकुण ०३ मोबाईल फोन असा एकुण १७,२०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून, दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव बजाजनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (गुन्हेशाखा), मा. श्री. वैभव जाधव सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, पोउपनि. मनोज राऊत, पोहवा. नरेश तुमडाम, विजय यादव, अर्जुन यादव, कमलेश गणेर, मनिष टोंगे पोअं संजय दहीफडे व चापोहवा कमलेश गहलोद यांनी केली.



<u>३) गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— आस्थापना मालकास मारहाण करुन पळुन जाणाऱ्या आरोपींना त्वरित अटक.</u>

दिनांक १०.११.२०२६ चे ०२.०० ते ०२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सदर हद्दीत सुविधा बार ॲन्ड रेस्टारेंट येथे जबरदस्तीने प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चार अज्ञात मुलांना बारमालक नामे दुर्गेश

जैस्वाल यांनी अटकाव केला असता, त्या अज्ञात मुलांनी बालमालक यांना शिवीगाळ करुन मारहाण केली व तेथुन पळुन गेले. दरम्यान, गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे सदर हद्दीत घटनास्थळ परिसरात पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या माहीतीवरून, आरोपीचा परिसरात शोध घेवुन, आरोपी क्र. १) निर्वाण उर्फ चिंटु शालीग्राम उईक वय १९ वर्ष रा. जैन मंदीरजवळ, सदर नागपुर २) प्रियांशु चव्हाण वय २६ वर्ष रा. कार्पोरेशन शाळेजवळ, सदर, नागपुर व एक विधीसंघर्षग्रस्त वालक यांना ताब्यात घेऊन, पंचासमक्ष त्यांना घटनेसंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी संगनमताने बारमालकास मारहाण केल्याची कबुली दिली. याप्रकरणी फिर्यादी ऋत्विक जितेंद्र भावसार वय ३६ वर्ष रा. वैशाली नगर, आनंदी अपार्टमेंट, फ्लॅट क्र. २०३, पाचपावली, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द पोलीस ठाणे सदर येथे कलम २९६,११५(२),३५१(१),३५२,३(५) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त वालकास पुढील कार्यवाहीस्तव सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात, मसपोनि. श्रीमती मंगला हरडे व पोहवा. प्रफुल्ल मानकर, संदीप भोकरे, पोअं. कुणाल लांडगे व पंकज बागडे यांनी तसेच, पोलीस ठाणे सदरचे बिट मार्शल पोहवा. दिलीप ठाकरे आणि बाळकृष्ण ननावरे यांनी संयुक्तपणे केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे नंदनवन :– चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, घर क्र. ४५६, लक्ष्मी किराणा दुकानाजवळ, दर्शन कॉलनी येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती सविता जितेंद्र बोकडे वय ५० वर्ष हया दिनांक ०९.११.२०२६ चे ०१.०० चे सुमारास, त्यांचे राहते घराचा मुख्य दरवाजा उघडा ठेऊन घरात झोपलेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे उघडे दारातुन आंत प्रवेश करून, घरातील लोखंडी कपाटातील वेगवेगळे सोन्याचे दागिने वजनी ४५ ग्राम एकुण किंमती १,००,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. पद्माकर कुमटकर ९९२३५७८३०३ यांनी अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे जरीपटका :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०९.११.२०२६ चे १९.३१ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटकाचे बिट मार्शल हे कर्तव्यावर असतांना त्यांना नियंत्रण कक्षातर्फे माहिती मिळाली की, राहुल नगर–समता नगर रोडवरील विकास धान्य भंडार समोरील रोडवर एक इसम अपघात होऊन मृत अवस्थेत पडुन आहे. अशा माहितीवरुन, घटनास्थळी गेले असता, तेथे एक अनोळखी इसम वय अंदाजे ५० वर्ष हे अपघात होऊन जखमी व मृत अवस्थेत दिसुन आले. परिसरात विचारपुस करुन घटनास्थळीवरील सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता, त्यांना एका सहाचाकी वाहन क्र. एमएच ४० सीडी ४५८७ चा चालक नामे आकाश देवराव राऊत वय ३३ वर्ष रा. प्लॉट क्र. ७३, समतानगर जरीपटका, नागपूर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन यातील अनोळखी इसमास धडक देऊन घटनास्थळावरुन पळुन जातांना दिसुन आला. अनोळखी इसमाचा मृतदेह पुढील कार्यवाहीस्तव मेयो हॉस्पीटल येथे पाठविण्यात आला आहे. अनोळखी मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोअं. कार्तिक अंबाडरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७,१८४ मोवाका अन्वये गुन्हा

दाखल करून, आरोपीचा शोध घेवुन, त्यास त्याचे राहते घरुन ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्याने अपघात केल्याची कबुली दिली. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अमित देशमुख)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.